# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10 / 05 / 2023 (बुधवार) सकाळ


### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण २३७५०००/—रू. चा मुद्देमाल जप्त
### पोलीस स्टेशन केळवद यांची कारवाई

दिनांक ०८/०५/२०२३ रोजी २२.५० वा. सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार आत्राम ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांचा पोलीस स्टाफ यांनी मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरेवरून मौजा बिहाडा फाटा (खापा नरसाळा) येथे नाकाबंदी करीत असतांना कथ्या रंगाचा आयसर भरधाव वेगाने पांढुर्णा (एम. पी) कडुन नागपूर रोडने येतांना दिसला. त्यास पंचासमक्ष स्टाफचे मदतीने लाल ट्राफिक लाईटने थांबण्याचा इशारा केला असता सदर वाहन चालक याने आपले ताब्यातील वाहन न थांबवता नागपूरच्या दिशेने पळुन जात होता त्यास स्टाफ व पंचासह पाठलाग करून परत लाल ट्राफिक लाईटने थांबण्याचा इशारा करून सदर वाहन रोडच्या कडेला थांबवुन पंचासमक्ष आयसर गाडी क्र. RJ-02/GC-2669 मध्ये **आरोपी नामे— १) चालक इलियास खान शेर मोहम्मद, वय २३ वर्ष, रा. मनक्का, ता.जि अलवर २) आसू मोहम्मद मो. रियाज कुरेशी, वय ३० वर्ष रा. हर्रा, ता. सरदाना जि मेरठ (यूपी) ३) मोहम्मद सयाम बाबू कुरेशी वय ३० वर्ष रा. हर्राता सरदाना जि. मेरठ ४) शाहीद खान अयूब खान, वय २३ वर्ष रा. पडावना ता. रामगढ जि अलवर (राजस्थान) ५) शकिल कुरेशी अब्दुल रहमान वय ३५ वर्ष रा हवेली मोहगाव ता सौसर जि. छिंदवाडा (म. प्र)** यांनी सदर वाहनाच्या मागच्या डाल्यामध्ये १) २२ नग गोवंश प्रती किंमती १५,०००/—रू. प्रमाणे एकुण ३,३०,०००/—रू. २) ०३ नग बैल गोवंश प्रत्येकी किंमती १५,०००/—रू. प्रमाणे एकुण किंमती ४५,०००/—रू. ३) ०२ नग मृतक बैल गोवंश किंमती ००/०० रू. जनावरे यांना अत्यंत क्रुर व निर्दयतेने डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन असल्याचे दिसले. आरोपीतांच्या ताब्यातून आयसर क्र. RJ-02/GC-2669 किंमती अंदाजे २०,००,०००/—रू. व वाहनाचे मागील डाल्यामध्ये १) २२ नग गोवंश प्रती किंमती अंदाजे १५,०००/—रू. प्रमाणे किंमती अंदाजे एकुण ३,३०,०००/—रू. २) ०३ नग बैल गोवंश प्रत्येकी किंमती १५,०००/—रू. प्रमाणे एकुण किंमती ४५,०००/—रू. ३) ०२ नग मृतक बैल गोवंश किमती ००/००रू. चे गोवंश असा एकुण वाहनासह २३,७५,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर ०५ आरोपीतांविरूद्ध कलम २७९, ४२९, ३४ भा.द.वि. सहकलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५ सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम, सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल केला असुन २२ नग गोवंश, ०३ नग बैल गोवंश, ०२ नग मृत बैल गोवंश जनावरे पुढील देखभाल व्यवस्थेकरीता जय श्रीकृष्ण गौरक्षण गौशाळा गोंडेगाव ता. नरखेड येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही श्री विशाल आनंद, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, श्री. अजय चांदखेडे उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन केळवद येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार आत्राम, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमरदीप कामठे, सहायक फौजदार किशोर ठाकरे, चालक पोलीस हवालदार गुणवंता डाखोळे, पोलीस नायक दीपक इंगळे, पोलीस शिपाई धोंडुतात्या देवकते, सचिन येळकर यांनी केली आहे.

# रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०.५ किमी अंतरावर जवाहर टी पॉईंट खापा येथे दिनांक ०९/०५/२०२३ चे ०४/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, काही इसम जवाहर टी पॉईंट खापा येथे कन्हान नदीच्या पात्रातुन अवैधरित्या उत्खनन करून रेतीची ट्रकव्दारे चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी जावून १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.— ४० सि. डी. —५९०३ चा चालक **आरोपी नामे— १) दिनेश शामराव उपवंशी, वय २० वर्ष, रा. कोराडी ०२) संजय विजपाल रघुवंशी, वय २८ वर्ष, रा. कोराडी** सदर चालक मालक यांचेवर गुन्हा नोंद करून त्यांचेकडुन १) १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.— ४० सि.डी. —५९०३ किंमती अंदाजे २५,००,०००/— ०२) ०५ ब्रास रेती किंमती अंदाजे २०,०००/— असा एकुण २५,२०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी खापा पोलीसांनी, पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. खडसे पो.स्टे. खापा मो. नं. ९५०३२५०३७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर